# महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO: ९००१:२०१५)(ISO/IES: २७००१:२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी,बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दूरध्वनीक्र.:२६४७१२५५ (का.) फॅक्स ९१-०२२-२६४७३९७९

ई-मेल:secretary@msbte.com वेब :www.msbte.org.in


जा. क्र. मरातंशिमं/ का.५४/ Remedial Coaching/२०२३/1350 दिनांक 14 MAR 2023

**महत्वाचे परिपत्रक**

**प्रति,**
प्राचार्य,
मंडळाशी संलग्नित सर्व शासकीय तंत्रनिकेतने
व शासकीय स्वायत्त तंत्रनिकेतने.

**विषय** :- शासकीय तंत्रनिकेतनातील द्वितीय सत्रातील विद्यार्थ्यांकरिता Remedial Coaching ची अंमलबजावणी COMET Module मार्फत करण्याबाबत.

**संदर्भ** :- मंडळाचे परिपत्रक क्र.मरातंशिमं/का-५४/ Baseline Test/२०२३/१४०३ दि.२८-०२-२०२३.

संदर्भीय पत्रानुसार द्वितीय सत्रातील विद्यार्थ्यांकरिता Applied Mathematics व Applied Science या विषयाच्या Baseline Test घेण्यात आलेल्या आहेत. सदर Baseline Test च्या निकालाचे विश्लेषण मंडळामार्फत करण्यात आलेले आहे. सदर विश्लेषण तीन प्रकारे करण्यात आलेले आहे. त्यामध्ये ७० % पेक्षा जास्त गुण प्राप्त करणारे विद्यार्थी, ५०% ते ७०% गुण प्राप्त करणारे विद्यार्थी आणि ५०% पेक्षा कमी गुण प्राप्त करणारे विद्यार्थी यांचा समावेश आहे. त्यापैकी ५०% पेक्षा कमी गुण प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांकरिता Remedial Coaching ची अंमलबजावणी संस्थास्तरावर करण्यात यावी. तसेच ५०% पेक्षा जास्त गुण प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार Remedial Coaching करण्यात यावे.

सदर Remedial Coaching ची अंमलबजावणी सुयोग्य प्रकारे होण्याच्या दृष्टीने Course Outcome Mentoring & Evaluation Tool **(COMET)** हे Software Module मंडळामार्फत विकसित करण्यात आलेले आहे. सदर Software मध्ये Mobile Based Teachers App व Student App तसेच Web based Dashboard असे तीन Module आहेत. सदर Software प्रणालीचा वापर द्वितीय सत्रामध्ये शासकीय तंत्रनिकेतनातील Applied Mathematics व Applied Science या विषयाच्या Remedial Coaching च्या विश्लेषणासाठी करण्यात येणार आहे.

मंडळाशी संलग्नित सर्व शासकीय तंत्रनिकेतनांनी वर नमूद केल्याप्रमाणे Applied Mathematics व Applied Science या दोन विषयाच्या विद्यार्थ्यांचे Mapping संबंधित अध्यापकाबरोबर करुन www.omonitoring.msbte.ac.in या संकेतस्थळावर दि. १७/०३/२०२३ पर्यंत Upload करावे.

MSBTE COMET हे App संबधित अध्यापकांनी Google Play Store वरुन दि. १७/०३/२०२३ पासून Remedial Coaching च्या अंमलबजावणीसाठी download करावे. www.omonitoring.msbte.ac.in या संकेतस्थळावर User Faculty Manual उपलब्ध आहे. तसेच विद्यार्थ्याकरिता Student User Manual उपलब्ध आहे. सदर User Faculty Manual नुसार Remedial Coaching बाबतची कार्यवाही अध्यापकांनी करणे आवश्यक आहे. सदर Manual मध्ये नमूद केल्याप्रमाणे CO नुसार Start date व End date चे Schedule COMET Mobile App मध्ये अध्यापकांनी वेळोवेळी add करावे. दि. २०/०३/२०२३ पासून सदर Software मध्ये Remedial Coaching ची माहिती भरण्यास सुरूवात करावी.

सदर Module मध्ये प्रत्येक संस्थेच्या Applied Mathematics व Applied Science हे विषय शिकवत असलेल्या अध्यापकांनी त्याच विषयातील विद्यार्थ्यांचे Mapping करणे आवश्यक असून, त्याकरिता संस्थानी Faculty Student Allocation करण्यासाठी खालीलप्रमाणे प्रक्रिया राबवावी.

१. www.omonitoring.msbte.ac.in या संकेतस्थळाला भेट देऊन तदनंतर Login बटण वर क्लिक करा.
२. Username, Password (Institute Monitoring)आणि Captcha टाकून लॉगिन करा.
३. Add faculty option वापरून संस्थेने सदर विषयाकरिता अध्यापकांची नावे add करावी.
४. MSBTE COMET portal च्या डाव्या बाजूच्या Faculty Student Allocation लिंकला क्लिक करा.
५. त्यानंतर Program, Course, Faculty ची निवड करून Submit बटणवर क्लिक करा
६. त्यानंतर अध्यापक शिकवत असलेल्या विद्यार्थ्यांची निवड करून submit button वर click करा. (सगळे विद्यार्थी निवडायचे असतील तर Select All वर क्लिक करा.)

सदर कार्यवाही करीत असताना काही तांत्रिक अडचणी आल्यास श्री.सुरज (software support person) यांना suraj@bynaric.in या मेलवर तसेच मोबाईल क्र.८९७१६४८०१७ वर संपर्क साधावा.

स्वायत्त तंत्रनिकेतनातील द्वितीय सत्रातील विषय मंडळाच्या अभ्यासक्रमानुसार नसल्याने MSBTE COMET प्रणालीमध्ये स्वायत्त तंत्रनिकेतनाचा अंतर्भाव केलेला नाही. मात्र स्वायत्त तंत्रनिकेतनानी द्वितीय सत्रातील विषयाकरिता त्यांच्या स्तरावर Remedial Coaching ची अंमलबजावणी करावी व त्याची माहिती दर १० दिवसांनी www.omonitoring.msbte.ac.in या संकेतस्थळावर Remedial Coaching बाबत उपलब्ध करून दिलेल्या Link वर Institute Monitoring चे credentials वापरून upload करावी.

उपरोक्त प्रमाणे Remedial Coaching बाबत विहित कालावधीत योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत संस्थांच्या प्राचार्यांची राहील, याची नोंद घ्यावी.

( डॉ. महेंद्र रा. चितलांगे )
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.

**प्रत - माहिती व कार्यवाहीकरिता :-**

उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर यांना कळविण्यात येते की, Remedial Coaching च्या अंमलबजावणी बाबतचा आढावा वेळोवेळी घेण्यात यावा.